Vol-13 Special Issue- 1.2 ISSN- 2349-7076

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter)
Patron: Prof. R. G. Kothari
Chief Editor: Prof. Jignesh B. Patel
Email:- Mo. 9429429550 ctefeduinspire@gmail.com

# मराठी साहित्यातील 'वसुधैव कुटुंबकम' संकल्पनेचा तात्विक अभ्यास

**किर्ती वि. दानापूरकर**
संशोधक

## सारांश

'वसुधैव कुटुंबकम' ही केवळ एक म्हण नसून, ती एक जीवनशैली आहे.ही संकल्पना मनुष्याला एकतेने सहानुभूतीने आणि जबाबदारीने जगायला शिकवते.मराठी साहित्याच्या इतिहासात संत ज्ञानेश्वर यांचे अतिशय महतवाचे व अढळ स्थान आहे. ''हे विश्वची माझे घर | एते जना माझी भावंडे | एकत्वे बांधिले | सुखदु:खे ||'' ही या श्लोकातून संत ज्ञानेश्वरांनी मांडलेला विचार आणि वसुधैव कुटुंबकम यामध्ये अतिशय जवळचा व सखोल तात्विक संबंध आहे. वैश्विक बंधुता, मानवता व सहअस्तित्व, निसर्गाबद्दल जबाबदारी, शांतता व एकात्मता या मुल्यांमधून हा विचार प्रगल्भतेने मांडलेला आहे. मराठी साहित्याने 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेला केवळ तात्विक न ठेवता जीवनाशी जोडलेले दिसून येते. संत साहित्याने तिचा अध्यात्मिक पाया मजबूत केला तर आधुनिक साहित्याने तिला सामाजिक वास्तवात उतरवले त्यामुळे मराठी साहित्य हे भारतीय मानवतावादी परंपरेचे प्रभावी प्रतिनिधीत्व करते, असे निश्चितपणे म्हणता येईल.

### प्रस्तावना :

'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना भारतीय तत्वज्ञानाच्या परंपरेमध्ये मानवी जीवनाला वैश्विक दृष्टी देणारी, सर्वसमावेशक आणि वानवतावादी भूमिका अधोरेखित करणारी आहे.'संपूर्ण पृथ्वी हेच एक कुटुंब आहे.' असा या संकल्पनेचा आशय असून ती केवळ सामाजिक किंवा धार्मिक विचारधारा न राहता एक सखोल तात्विक जीवनदृष्टी आहे.मराठी साहित्याने या संकल्पनेचा स्विकार करुन तीला सामाजिक वास्तवाशी जोडले आहे.संत साहित्यापासून ते आधुनिक साहित्यापर्यंत 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना विविध रुपांमध्ये व्यक्त झालेली दिसून येते.

### संशोधनाची उद्दिष्टे :

मराठी संत साहित्यामधील 'वसुधैव कुटुंबकम' या विचाराचे स्वरुप अभ्यासणे.
'वसुधैव कुटुंबकम' संकल्पनेचा तात्विक अर्थ स्पष्ट करणे.
भारतीय तत्वज्ञानातील या संकल्पनेची मुळे शोधणे.
आधुनिक मराठी साहित्यातील मानवतावादी दृष्टीकोनाचे विश्लेषण करणे.
समकालीन सामाजिक संदर्भात 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेचे महत्व अधोरेखीत करणे.

### 'वसुधैव कुटुंबकम' : तात्विक पार्श्वभूमी

'वसुधैव कुटुंबकम' हा विचार महाउपनिषद या ग्रंथातून आलेला आहे. याचा तात्विक अर्थ याप्रमाणे राहिल.
अयं निजः परो वेति गणना लघुचेतसम्। उदारचरितानां तु वसुधैव कुटुंबकम ॥
**अर्थ :-** हा माझा भाऊ आहे, हा परका आहे, अशी गणना संकुचित मनाची लोक करतात, मात्र उदार मनाच्या लोकांसाठी संपूर्ण पृथ्वी एकच कुटुंब आहे. या उक्तीतून संकुचित आणि उदार मानसिकतेतील फरक स्पष्ट होतो.तात्विकदृष्टया ही

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

संकल्पना अव्दैत वेदांताशी निगडीत आहे सर्व जीवांत एकाच आत्मतत्वाची अनूभूती मानते तसेच भेद, व्देष अहंकार यांना नाकारते.ही संकल्पना केवळ नैतिक शिकवण नसून मानव जीवनाचा अध्यात्मिक पाया आहे.

## मराठी संत साहित्यातील 'वसुधैव कुटुंबकम'

मराठी संत साहित्य हे 'वसुधैव कुटुंबकम' विचाराचे सर्वात प्रभावी माध्यम आहे.

**संत ज्ञानेश्वर :** ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीमध्ये अव्दैत तत्वज्ञानाचा प्रभाव स्पष्ट जाणवतो 'विश्वची माझे घर' हा भाव 'वसुधैव कुटुंबकम' विचाराचा मूळ आत्मा आहे.

**संत नामदेव :** नामदेवाच्या अभंगात ईश्वर सर्वत्र आहे असा भाव आहे. जात-पात उच्च नीचतेच्या कल्पना ते नाकारतात.

**संत तुकाराम :** तुकाराम महाराजांच्या अभंगात करुणा, दया, प्रेम आणि सर्व जीवांप्रती आपुलकी दिसून येते.

'जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले' हा विचार वैश्विक कुटुंबभावनेचा उत्कृष्ट नमुना आहे.

**संत एकनाथ :** एकनाथ महाराजांनी सामाजिक समतेचा आग्रह धरत 'वसुधैव कुटुंबकम' संकल्पनेला सामाजिक अधिष्ठान दिले.

## मध्ययुगीन मराठी साहित्य आणि मानवतावाद :

मध्ययुगीन मराठी साहित्याने धार्मिकता आणि मानवतावाद यांचा सुंदर समन्वय साधला आहे.या काळातील भारुडे, ओव्या यातून समाजातील सर्व घटकांना एकत्र बांधून ठेवणारी दृष्टी विकसीत झाली. ही दृष्टी 'वसुधैव कुटुंबकम' विचाराशी सुसंगत आहे.

**आधुनिक मराठी साहित्य आणि 'वसुधैव कुटुंबकम' :** आधुनिक मराठी साहित्याने या संकल्पनेला नव्या सामाजिक संदर्भात मांडले.

**महात्मा फुले :-** फुल्यांचा मानवतावाद, स्त्री-शुद्र शिक्षणाचा आग्रह हा सार्वत्रिक बंधूत्वाच्या संकल्पनेशी निगडीत आहे.

**महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :-** सामाजिक समतेचा विचार करतांना त्यांनी मानवी ऐक्याचा आग्रह धरला.

**साने गुरुजी :-** साने गुरुजींच्या साहित्यात प्रेम करुणा आणि जागतिक बंधुता यांचा प्रभाव दिसतो. "श्यामची आई" हे पुस्तक मानवी मूल्यांचे प्रतिक आहे.

**पु.ल. देशपांडे :-** पु.ल. देशपांडे यांच्या लेखनातून माणसांमधील नातेसंबध, सहवेदना आणि माणूसकी हे 'वसुधैव कुटुंबकम' विचाराचे आधुनिक रुप आहे.

## तात्विक विश्लेषण :

'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना पुढील तत्वांवर आधारलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| अव्दैतवाद | : | सर्वत्र एकच आत्मतत्व आहे. |
| मानवतावाद | : | मानवकेंद्रित मूल्यव्यवस्था |
| सार्वत्रिक नितीमत्ता | : | सर्व जीवांप्रती समान नैतिक जबाबदारी असणे. |
| करुणा व प्रेम | : | जीवनाचे अंतिम सत्य |

मराठी साहित्याने या तत्वांना भावनिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवर रुजवले आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**समकालीन काळातील उपयुक्तता :-**

आजच्या जागतिकीकरणाच्या संघर्षाचा आणि पर्यावरणीय संकटांच्या काळात 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना अधिकच महत्वाची ठरते.धार्मिक तेढ, वांशिक भेद, राष्ट्रवादाचा संकुचित दृष्टिकोण, यावर उपाय म्हणून ही संकल्पना मार्गदर्शक ठरु शकते.

**आधुनिक मराठी साहित्यातील अभिव्यक्ती :**

**दलित साहित्य** : दलित साहित्यातून विषमतेवर आधारीत जगाला आव्हान दिले जाते. पण त्याचवेळी एकात्मतेचा आणि मानवी हक्कांचा संघर्ष 'वसुधैव कुटुंबकम' च्या व्यापक अर्थाला स्पर्श करतो.

**ग्रामिण साहित्य** : ग्रामीण साहित्यातून मातीशी जोडलेले नाते आणि माणुसकीचे व्यापक दर्शन घडते.

**स्त्रीवादी साहित्य** : स्त्रियांच्या हक्कांसाठी लढतांना वैश्विक न्यायाची आणि समानतेची मागणी या संकल्पनेशी जोडली जाते.

**कथा, कादंबऱ्या आणि कविता** :

अनेक लेखक मानवी दु:ख, आनंद, संघर्ष यांना वैश्विक स्तरावर पाहतात. जसे की, वि.स. खांडेकर यांच्या काही साहित्यकृती मानवी मूल्यांवर भर देतात.

**'वसुधैव कुटुंबकम'आणि मराठी साहित्य उच्च शिक्षणातील नवीन प्रवाह :**

भारतीय तत्वज्ञानातील 'वसुधैव कुटुंबकम' हा महत्वाचा विचार असून संपूर्ण विश्व एक कुटूंब आहे अशी भावना व्यक्त करतो.मराठी साहित्याच्या मूल्यपरंपरेशी अतिशय सुसंगत असा हा विचार आहे. उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात विशेषत: मराठी साहित्य, मानवविद्या, सांस्कृतिक अभ्यास या संकल्पनेला नवे संदर्भ मिळत आहे.

**उच्च शिक्षणातील अभ्यासविषय : आजच्या अभ्यासक्रमात हा विचार पुढील विविध अंगानी अभ्यासला जातो.**

**मूल्यधिष्ठित साहित्य अभ्यास-** मानवतावाद, नैतिकता, जागतिक शांतता प्रस्तापित करणे.

**आंतर सांस्कृतिक अभ्यास-**भारतीय साहित्य व जागतिक साहित्याची तुलना करणे.

**पर्यावरणीय साहित्य-** निसर्गाचे महत्व समजून घेऊन निसर्गाशी कुटुंबवत नाते निर्माण करणे.

**समावेशकता व सामाजिक न्याय -** सर्व मानव एक कुटुंब आहे हि महत्वाची संकल्पना समजून घेणे.

**नविन प्रवाह :**

**उच्च शिक्षणात** 'वसुधैव कुटुंबकम' चा अभ्यास पुढील नव्या प्रवाहात दिसतो.

**आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन :** उच्च शिक्षणातील नविन प्रवाहामध्ये आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन महत्वपूर्ण आहे. या दृष्टिकोनाचा अर्थ म्हणजे एखाद्या समस्येचा किंवा विषयाचा अभ्यास एकाच शाखेत न करता विविध विद्याशाखांच्या ज्ञानाचा समन्वय साधून करणे. 'वसुधैव कुटुंबकम' व आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन या दोघांमधील संबध पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतो.

**एकात्मतेचा विचार :** 'वसुधैव कुटुंबकम' संपूर्ण मानवजातीला एकत्र बांधतो तर आंतरविद्याशाखीय दृष्टीकोन विविध विषयांना (इतिहास, विज्ञान, समजाशास्त्र अर्थशास्त्र, तत्वज्ञान इ.) एकत्र आणतो म्हणजेच दोन्हीठिकाणी वेगळेपणा ऐवजी एकात्मता हा केंद्रबिंदू आहे.

EduInspire-An International E-Journal
An International Peer Reviewed and Referred Journal (www.ctegujarat.org)
Council for Teacher Education Foundation (CTEF, Gujarat Chapter) Email:- ctefeduinspire@gmail.com

**परस्परावलंबनाची जाणीव :** कुटुंबातील सदस्य जसे एकमेकांवर अवलंबून असतात. तसेच विविध विद्याशाखा एकमेकांच्या ज्ञानावर अवलंबून असतात.

**समग्र दृष्टिकोन :** 'वसुधैव कुटुंबकम' संपूर्ण जागाचा समग्र विचार करायला शिकवते तर आंतरविद्याशाखीय शिक्षण समस्येकडे तुकड्यातुकड्याने नव्हे तर संपूर्णतेने पाहते.

**मानवी मुल्यांची जोपासना :** 'वसुधैव कुटुंबकम' करुणा, सहिष्णुता, समता यांचा संदेश देते तर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य, संवाद आणि व्यापक दृष्टी विकसित करते.

**वैश्विक समस्यांचे समाधान :** आजच्या जागतिक समस्या जसे हवामान बदल, दारिद्रय, आरोग्य या सर्व मानवजातीशी संबधित आहे हे 'वसुधैव कुटुंबकम' सांगते तर अश्या समस्या सोडवण्यासाठी आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन आवश्यक ठरतो.

**जागतिकीकरणाचा संदर्भ :** स्थलांतर बहुसांस्कृतिकता, सहअस्तित्व या संकल्पनांचा अभ्यास उच्च शिक्षणात दिसून येतो.

**डिजिटल व समकालीन साहित्य :** यामध्ये जागतिक प्रश्नांवर आधारित लेखन केले जाते.

**शांती व संघर्ष अभ्यास :**

साहित्याचा माध्यमांतून विश्वबंधूत्वाचा विचार यामध्ये केल्या जातो. उच्च शिक्षणातील या नविन प्रवाहांमूळे विद्यार्थ्यांमध्ये जागतिक नागरिकत्वाची भावना निर्माण होते. मानवी मूल्यांची जाणीव वाढते. स्थानिक साहित्याला जागतिक संदर्भ मिळतात. विचारशील संवेदनशील समाजनिर्मितीस हातभार लागतो. 'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना मराठी साहित्यांच्या आत्म्याशी निगडीत आहे. उच्च शिक्षणातील नव्या अभ्यासप्रवाहांतून हा विचार अधिक व्यापक समकालीन आणि जागतिक पातळीवर अभ्यासला जात असून मराठी साहित्याला नवे अर्थ संदर्भ व व्यापकता प्राप्त होत आहे.

## समारोप :

'वसुधैव कुटुंबकम' ही संकल्पना वैश्विक बंधुभाव, एकात्मता आणि सर्व मानवी मूल्यांच्या आधारे मराठी साहित्यातून वेगवेगळ्या रुपांतून साकारत आहे. अनेक साहित्यीक मानवी संबंध वैश्विक बंधूभाव आणि सामाजिक एकात्मतेचे चित्रण लेखनातून व्यक्त करतात. विशेषत: दलित, ग्रामिण, स्त्रीवादी साहित्यातून ही जाणीव विविध रुपात दिसून येते. जेथे लेखक मानवी मूल्यांवर भर देतात. अशाप्रकारे 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेला केवळ तात्विक आधार नाही तर त्यास एक अध्यात्मिक अधिष्ठान प्राप्त झाले आहे आणि मराठी साहित्याने प्रस्तुत संकल्पनेस सामाजिक वास्तवात उतरवले त्यामूळे मराठी साहित्य हे भारतीय मानवतावादी परंपरेचे प्रभावी प्रतिनिधीत्व करते असे निश्चितपणे म्हणता येईल.

## संदर्भ सूची :

ज्ञानेश्वरी – संत ज्ञानेश्वर
मराठी संत साहित्याचा इतिहास-डॉ. रा.ना. चव्हाण
भारतीय तत्वज्ञान – डॉ. दत्तात्रेय आपटे
तुकाराम गाथा – संत तुकाराम
marathisahitya.com